नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्गासाठी (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) गौण खनिज उत्खननाबाबत परवानगी देण्याची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः गौखनि १०/१२१८/प्र.क्र.४६८/ख
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २७/०५/२०१९

वाचा :-

१) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि १०/०८१२/प्र.क्र.६१३/ख, दिनांक १८/०७/२०१३.

२) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि १०/१०१८/प्र.क्र.३७९/ख, दिनांक १४/११/२०१८.

: शासन परिपत्रक :-

खाण व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ मधील कलम १५ अनुसार राज्य शासनास गौण खनिजाचे नियम करण्याचे अधिकारानुसार राज्य शासनाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ तयार करुन, दिनांक १९/०८/२०१३ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द केले. सदर नियम दिनांक २४/१०/२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्यात दिनांक २४/१०/२०१३ पासून लागू करण्यात आले. शासन अधिसूचना क्रमांक गौखनि १०/०३१६/प्र.क्र.४७२/ख, दिनांक १२/०१/२०१८ अन्वये महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ४६ मध्ये सुधारणा करुन शासन अधिसूचित करेल अशा कोणत्याही महत्त्वाच्या सार्वजनिक प्रकल्पाच्या कामाकरीता आवश्यक असलेल्या गौण खनिजाच्या उत्खननावर स्वामित्वधन माफ किंवा स्वामित्वधनाचे दर कमी करता येतील अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने शासनाने संदर्भाधीन दिनांक १४/११/२०१८ च्या अधिसूचनेन्वये नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती मार्ग प्रकल्पास महत्त्वाचा सार्वजनिक प्रकल्प म्हणून अधिसूचित करुन, त्यास आवश्यक असलेल्या गौण खनिजांच्या उत्खननावर आकारणीपात्र असलेले स्वामित्वधन बसविण्यास सूट देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्गासाठी गौण उत्खननाकरीता परवानगी देण्याबाबतची कार्यपध्दती कशी असावी या बाबत पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

१) नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्गासाठी प्रकल्प प्रवर्तकाने / विकासकाने / कंत्राटदाराने प्रकल्पाअंतर्गत घोषीत भुखंडावरील गौण खनिजाचा वापर करण्यासाठी तसेच सदर मंजुर प्रकल्पांतर्गत क्षेत्राच्या बाहेरुन उत्खनन करुन आणावयाच्या गौण खनिजावरील स्वामित्वधनातून १००% सुट देण्यात आली असल्याने या प्रकल्पाकरीता वापरावयाच्या गौण खनिजाचे जेथून उत्खनन करण्यात येणार आहे त्या क्षेत्रासाठी प्रकल्प प्रवर्तक / विकासक/ कंत्राटदार यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे गौण खनिज प्रापण योजना (Minor Mineral Procurement Plan) सादर करुन सदर योजना मंजूर करुन घ्यावी.

२) अशी गौण खनिज प्रापण योजना (Minor Mineral Procurement Plan) ही महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या प्रकरण चार मध्ये नमूद केलेल्या जिल्हास्तरीय समिती मार्फत मंजुर करण्यात यावी.

३) जिल्हास्तरीय समितीने सदर Procurement plan मंजुर करतांना प्रकल्प प्रवर्तकाने / विकासकाने/ कंत्राटदाराने सादर केलेल्या प्रकल्पांतर्गत संकल्पित कामाच्या अंदाजपत्रकानुसार किती प्रमाणात गौण खनिज आवश्यक आहे याची खात्री करुन तसेच प्रकल्पाच्या ठिकाणी उपलब्ध होणारे गौण खनिज विचारात घेऊन आवश्यक असलेली गौण खनिज निहाय परिमाण प्रमाणित करावे.

४) नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्गाच्या कंत्राटदारांनी महामार्गाच्या कामाचे मंजुर अंदाजपत्रक व गौण खनिज प्रापण योजनेच्या मंजुरी नुसार आवश्यक गौण खनिजाचे परिमाण, अशा गौण खनिज उत्खननाची नियोजीत ठिकाणे व त्यांच्या गाव नमुना नंबर ७/१२ उताऱ्यासह संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे गौण खनिज उत्खननाच्या परवानगीसाठी विहित नमुन्यात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या संबंधित प्रकल्प अभियंता/कार्यकारी अभियंता यांच्या गौण खनिज मागणी प्रमाणित करण्याबाबतच्या प्रमाणपत्रासह अर्ज सादर करावा .

५) जिल्हास्तरीय समितीने मंजुर केलेल्या गौण खनिज प्रापण योजनेच्या (Minor Mineral Procurement Plan)अधिन राहुन संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रकल्प प्रवर्तक / विकासक / कंत्राटदार यांच्या अर्जाच्या अनुषंगाने गौण खनिजाच्या उत्खननास परवानगी द्यावी, व त्यानुसार आवश्यक तेवढ्या परिमाणाच्या वाहतूकीसाठी " Zero Royalty transit pass" उपलब्ध करुन द्यावेत. प्रकल्प प्रवर्तक / विकासक / कंत्राटदार यांच्याकडून प्राप्त झालेल्या अर्जावर ७ दिवसात जिल्हाधिकारी यांनी निर्णय घेणे आवश्यक राहील. मंजुर करण्यात आलेल्या परवान्याची प्रत संबंधित उप विभागीय अधिकारी, तहसिलदार यांचेकडे पाठविण्याची व्यवस्था संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावी.

६) सदर Zero Royalty Transit Pass गौण खनिजाचा माल उतरवून घेताना प्रकल्पाच्या स्थळावर जमा करुन घेण्यात यावेत, सदर पास तपासणी करिता उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

७) संबंधित उप विभागीय अधिकारी, तहसीलदार व क्षेत्रीय महसूल यंत्रणेने अशा तात्पुरत्या उत्खनन परवान्याच्या आधारे होणाऱ्या गौण खनिज उत्खननाच्या/ वापराच्या परिमाणाबाबत वेळोवेळी तपासणी करावी, मात्र नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग प्रकल्पांतर्गत मंजुरीपेक्षा जास्त गौण खनिज उत्खनन/ वापरण्यात आल्याचे दृष्टीपथास आल्यास संबंधित अधिकारी यांनी सदर प्रकल्पाचे काम न थांबवता सदर बाब जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणावी. अशी बाब निदर्शनास आल्यावर संबंधित जिल्हाधिकारी यांनी या जादाच्या उत्खननाबाबत संबंधित प्रकल्प प्रवर्तक/ विकासक/ कंत्राटदार यांना अशा जादाच्या उत्खननाबाबत लेखी ताकीद द्यावी व जादा उत्खननाचे असे प्रसंग तातडीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या निदर्शनास आणून द्यावेत. एकच विकासक / कंत्राटदार वारंवार परवानगीपेक्षा जादाच्या परिमाणात गौण खनिजाचे उत्खनन करत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा विकासक / कंत्राटदारास भविष्यात परवाना नाकारण्याचा अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना राहील.

८) सदर प्रकल्पांतर्गत भूखंडावर प्रकल्प विकासाकरीता केलेले उत्खनन मंजूर प्रकल्पांतर्गत बांधकामाकरिता अथवा प्रकल्पाशी निगडीत इतर विकास कामाकरिता वापरात न आणलेल्या तसेच

प्रकल्प प्रवर्तक / विकासक/ कंत्राटदार यांनी प्रकल्प क्षेत्राच्या बाहेरुन उत्खनन करुन आणलेल्या गौण खनिजाचा वापर हा प्रकल्प क्षेत्राव्यतिरिक्त इतर ठिकाणी करित असल्यास किंवा त्याची विक्री / वाणिज्यीक वापर केल्यास ही कृती शासनाच्या प्रचलित नियमानुसार दंडनीय ठरेल. या बाबत प्रचलित नियमानुसार दंडात्मक कारवाई करणे व अशा गौण खनिजाची विल्हेवाट लावण्याचे अधिकार क्षेत्रीय महसूल अधिकाऱ्यांना राहतील, तसेच नियमानुसार होणारी दंडात्मक रक्कम ही कंत्राटदारांच्या अंतिम देयकातून वसूल करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या संबंधित जिल्ह्यातील प्रकल्प अभियंता/कार्यकारी अभियंता यांची असेल. संबंधित कंत्राटदार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४८ (७) व (८) अनुसार कारवाईस पात्र असेल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०५२८१७०२३९३७१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Rohidas Chavan

Digitally signed by Dinesh Rohidas Chavan
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, serialNumber=8c2377ed235498603821d49922a210871ff6fb9b369722ac707aee7dcd87f2bd, cn=Dinesh Rohidas Chavan
Date: 2019.05.28 17:07:01 +05'30'

(दिनेश चव्हाण)
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मलबार हिल मुंबई. (पत्रान्वये)
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. राज्यमंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
७) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
८) सर्व विभागीय आयुक्त.
९) सर्व जिल्हाधिकारी.
१०) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
११) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) सर्व उपविभागीय अधिकारी.
१३) सर्व तहसिलदार.
१४) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
१५) महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.
१६) सर्व मंत्रालयीन विभाग.
१७) सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१८) निवडनस्ती "ख" कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.